## <u>निशाणी क्र.७० खालील आदेश</u>

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.४ दिनकर काशिनाथ कोळी यांचे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झालेने झालेला उपशम रद्द होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

(२) वादी यांचे असे कथन आहे की, वादी क्र.४ दिनकर कोळी हे दि.३०.१२.२०२३ रोजी मयत झाले आहेत. वादी यांना वादी क्र.४ यांचे वारस वेळेत अभिलेखावर आणता आले नसलेने त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेने त्यांचेविरुध्दचा दावा उपशम झालेला आहे. त्यामुळे, वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये उपशम रद्द होवून मिळणेची विनंती केलेली आहे.

(३) प्रतिवादीतर्फे यांचे असे म्हणणे आहे की, वादीचा अर्ज मान्य व कबूल नाही. वादीने जाणूनबूजूण वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब केलेला आहे. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

(४) प्रस्तुतचा निशाणी क्र.७० कडील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ठ्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचेतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीदीबाबत सदरचा दावा दाखल केला आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये वादी क्र.४ दिनकर काशिनाथ कोळी यांचे वारस अभिलेखावर घेणेस विलंब झालेने त्यांचे विरुध्दचा दावा उपशम रद्द होवून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. वादीचा निशाणी क्र.६६ कडील विलंब माफीचा अर्ज मंजूर केलेला आहे. वादी क्र.४ दिनकर कोळी हे दि.३०.१२.२०२३ रोजी मयत झालेले आहेत,असे वादीने फे.नि.क्र.७२ अन्वये दाखल केलेल्या मृत्यूपत्राच्या छायांकित प्रतीवरुन निदर्शनास येते. वादी क्र.४ मयत झालेनंतर त्यांचे वारस लिमीटेशन अॅक्ट १९६३ आर्टीकल १२० अन्वये ९० दिवसांच्या आत अभिलेखावर आणणे आवश्यक होते, परंतू मयत वादी क्र.४ चे वारस वेळेच्या आत न्यायपटलावर न

आलेने वादी क्र.४ च्या हद्दीपुरता दावा हा उपशम झालेला दिसून येतो. परंतू, वादी यांनी असे कथन केले आहे की, वादी हे वयस्कर इसम असून वादींना त्यांचे शेती कामाचे व्यापामुळे मे.कोर्टात हजर राहता आले नाही. तसेच वादी यांना वारस पुर्तता कायदा मुदतीत करावी लागते या बाबींची माहिती नव्हती. त्यामुळे वादी यांच्या विलंबाचे कारण लक्षात घेता, दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता, तसेच, दाव्याचे स्वरुप विचारात घेता न्यायहिताच्या दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

**<u>आदेश</u>**

वादी यांचा निशाणी क्र.७० कडील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2025.12.15 18:16:31 +0530

विटा. (श्रीमती.व्ही.डी.शिरसे)

दिनांकः- ०८.१२.२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,

ता.खानापूर, जि.सांगली.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | G.U.Varude, |
| Name of the Court | :- | Smt. V.D.Shirse<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 08.12.2025 |
| Order signed by P.O. on | :- | 12.12.2025 |
| Order uploaded on | :- | 15.12.2025 |